पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर पिन-४४४६०१
गुन्हेशाखा युनिट क्र. २ अमरावती शहर
दुरध्वनी क्रमांक :- ०७२१-२६७१०००
E mail id :- acpcrime.cpamt@nic.in

प्रेस नोट दि.१५/०२/२०२५

## अमरावती शहर गुन्हेशाखा युनिट क्र. २ यांची अवैध्दरित्या झिलेटींग स्फोटके बाळगणा-या इसमांवर धडक कार्यवाही - आरोपीच्या ताब्यातुन ४,१२,४२० /- रु चा मुददेमाल जप्त

मा.पोलीस आयुक्त श्री नविनचंद्र रेड्डी साहेब यांनी शहरातील अवैदय धंदे तसेच सराईत गुन्हेगारावर पाळत ठेवून कारवाई करणे बाबत निर्देशीत केल्यावरून गुन्हेशाखा युनिट क्रमांक २ चे पोलीस निरीक्षक श्री बाबाराव अवचार यांचे नेतृत्वात त्यांचे पथकाने खालील प्रमाणे कार्यवाही केली.

पोलीस निरीक्षक, गुन्हेशाखा अमरावती शहर यांचे आदेशाने पोलीस आयुक्तालय हद्दीत गुन्हेशाखा युनिट क्रमांक २ चे अधिकारी व अंमलदार हे अवैध्द धंदयांवर रेड व गुन्हेगार चेक करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना. गुप्त बातमीदारा कडुन खात्रीलायक माहीती मिळाल्या की, एक इसम एक ब्लास्टींगचा टॅक्टर क्रमांक एम.एच-३०-ए.झेड-१२०५ वर अवैध्यरित्या विनापरवाना झिलेटींग कांडया घेवून बगीया टि पाइंट बडनेरा कडुन एम.आय.डी.सी. अमरावती कडे घेवून जात आहे. अशा मिळालेल्या खात्रीलायक माहीतीवरुन युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री बाबाराव अवचार, सपोनि महेश इंगोले व त्यांचे पथकाने जुन्या बायपास वरील फिरंगी हॉटेल समोर सापळा रचुन टॅक्टर एम.एच-३०-ए.झेड-१२०५ ला थांबवून ट्रॅक्टर चालाकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव राहुल गजानन पुरी वय २९ वर्ष धंदा-चालक रा. मधापुरी ता.मुर्तिजापुर जि.अकोला असे सांगीतले. त्याचे ताब्यातून अवैध्दरित्या विनापरवाना १) ६३ नग सोलर सुपर पावर - ९० च्या जिलेटींग कांडया प्रत्येकी कि.अं. ९०/- रुपये एकुण ५,६७०/- रुपये, २) ०५ नग भगवा तार असलेले डेटोनेटर प्रत्येकी कि.अं. ५०/- रुपये एकुण २५०/- रुपये, ३) एफ.डी. ब्लास्टींग केबल अंदो २८० फुट लांबिचा कि.अं. ३७००/- रुपये, ४) ब्लार्सींग करीता वापरण्यात येणारी एक पावर बॅटरी कि.अं. २८००/- रुपये, ५) एक टॅक्टर एम. एच-३०-ए.झेड-१२०५ फ्राम ट्रॉक - ४५ कंपनीचा निळया रंगाचा ब्लास्टींग मशीन लागुन असलेला टॅक्टर कि.अं. ४,००,०००/- रुपये, असा एकुण ४,१२,४२०/- रुपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर टॅक्टर चालकास ब्लास्टींग टॅक्टर मालकाबाबत विचारले असता. त्याने टॅक्टर मालकाचे नाव रामभाउ काळे रा.ग्राम कवठा सोपीनाथ ता. मुर्तिजापुर जि.अकोला असे सांगितले. वरुन त्यांचे विरुध्द पो.स्टे. बडनेरा येथे कलम ९ (ब) बारी पदार्थ अधिनियम १८८४ , सहकलम ५, ६ बारी पदार्थ अधिनियम १९०८, सहकलम २८८, ३ (५) भा. भा.न्या.सं. सहकलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर ची कारवाई मा.पोलीस आयुक्त श्री नविनचंद्र रेड्डी साहेब, मा.पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हेशाखा श्रीमती कल्पना बारावकर मॅडम, मा.पोलीस उपायुक्त परीमंडळ- १ श्री. सागर पाटील साहेब, मा.पोलीस उपायुक्त परीमंडळ- २ श्री. गणेश शिंदे साहेब, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे श्री.शिवाजी बचाटे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि बाबाराव अवचार, गुन्हे शाखा युनिट २ अमरावती शहर, यांचे नेतृत्वाखाली युनिट २ चे सपोनि महेश इंगोले, पोउपनि संजय वानखडे, पोलीस अंमलदार :- बबलू येवतीकर, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमूख, मनोज ठोसर, संदीप खंडारे, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, चेतन कराडे, योगेश पवार,राजीक रायलीवाले, सागर ठाकरे चेतन शर्मा, राहुल दुधे यांनी केली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर